**Reviews of Literature**
**Volume 1 , Issue 1 / Aug 2013** **ISSN:-2347-2723**

# *शाहिरी कवीच्या लावणीतील स्त्रीशृंगाराची रूपे*

*किसन संदिपान पवार.*

मराठी विभाग , विज्ञान महाविद्यालय , सांगोला. ता.सांगोला ,जि.सोलापूर.

***सारांश :***

संतांच्या आणि पंडितांच्या कवितेपेक्षा अगदी वेगळी आणि स्वतंत्र वळणाची कविता अठराव्या शतकात लिहिली गेली. तिलाच शाहिरी काव्य किंवा कविता असे म्हटले गेले. राम जोशी, अनंत फंदी, सगनभाऊ, प्रभाकर, होनाजीबाळा, परशराम या शाहिरांच्या लेखणीतून आणि वाणितून निघालेले हे काव्य आणि डफ–तुणतुण्याची साथ घेऊन लोकांचे रंजन करू लागले, या कवितेचे विषय आणि प्रेरणा संत–पंताचे वेगळे होते. संत आणि पंत यांच्यापेक्षा शाहीर लोकजीवनात पूर्णपणे समरसून गेले. अध्यात्मिक स्पर्श असला तरी तो स्थायीभाव नव्हता, लोकजीवनातील विविध प्रसंग जीवावर उदार होऊन पराक्रम करणारे वीरपुरूष आणि आपल्या रूपगुणसौंदर्याने मोह–घालणा–या रूपयौवना यांचे प्रेमोत्कट भाव, वातावरणातील रंगेलपणा आणि रगेलपणा व त्यातून प्रत्ययाला येणारे असंख्य प्रसंग या सा–यांच्या प्रसंगातून, संस्कारांतून शाहिरांची कविता जन्माला आली, लोकांची भावना लोकांच्या शब्दात लोकांसाठी मांडणारे शाहीर हे खरे लोककवी होते. ऐहिक जीवनाचा त्यांना अपार लोभ होता. संसाराची लालसा होती. आणि पराक्रमाची बेहोशी होती. त्यामुळे समकालीन जीवनाचा प्रत्यय शाहिरी कवितेतून पुरेपुर होत नाही. असे म.ना.अदवंत म्हणतात. शाहिरी कविता म्हणजे मराठयाची खरी गाणी होत असा उल्लेख आहे. अशा या शाहीर कवीनी पोवाडा आणि लावणी या दोन काव्याच्या अंगाने आपल्या रचनेची निर्मिती केलेली आहे. त्यापैकी लावणीतील स्त्रीशृंगाराची रूपे या अनुषंगाने आपल्याला प्रस्तुत विचार करावयाचा आहे.

***प्रस्तावना :***

शाहिरांच्या काव्याला खरा बहर आला तो वीर रसाला मागे टाकून वीररसाच्या जोडीला शृंगार आला तेव्हा, शाहीरीत वीररसापेक्षा शृंगाराने आघाडी घेतली. त्या काळातील सुखासीन आणि विलासी वृत्तीतून लावणीची लकेर बाहेर पडू लागली. आणि त्यातील शृंगाराने सर्व काव्य व्यापून टाकले. अनेक ठिकाणी त्याचा अतिरेक झाला. व सदअभिरूचीच्या मर्यादा ओलांडल्या गेल्या. व लावणी वाङःमयासंबंधी प्रतिष्ठित आणि शिष्ट लोकांत एक प्रकारचा गैरसमज निर्माण झाला. लावणी वाङःमयातील शृंगाररसाचे स्वरूप पंडित–कवीच्या काव्यात येणा–या शृंगाररसापेक्षा वेगळे आहे. पंडितांचा शृंगार हा संस्कृतमधील शृंगारासारखा सांकेतीक आहे. स्त्री सौदर्याची कल्पना प्रचूर वर्णने व विरहवर्णने–विरहवर्णनातील तपशीलावर भर असे परंपरागत स्वरूप शृंगाररसाला प्राप्त झाले होते. मानवी मनाची सुक्ष्म कोडी उलगडण्याचा प्रयत्न नव्हता किंवा भावनेची उत्कठता दाखविण्याचाही प्रयत्न नव्हता, तर ज्यांचा शृंगार दाखविला त्या व्यक्ती वरच्या पातळीवरील होत्या. शाहिरी काव्याचे लौकिक जीवनातील सामान्य व्यक्तींचा शृंगार वर्णन करून काव्य विषय आपल्या अगदी जवळ आणला आणि शृंगाररसाच्या वर्णनात पूर्वीचे सर्व संकेत झुगारून देऊन स्वतंत्र व निराळी अशी अविष्काराची पध्दती अवलंबली.. स्त्री–पुरूषाच्या प्रेमभावनांचे अनेक सूक्ष्म बारकावे त्यांनी काव्यात रंगविली गेली.

प्रेमभावनांची अभिव्यक्ती सरळ व उत्कट शब्दांत होऊ लागली. विरहाच्या वर्णनात भावनेच्या उत्कठतेवर भर पडू लागला. मीलनाची अधिरता, पती विरहाची तळमळ – हुरहुर, प्रेमळ रूसवा, प्रतीच्या आगमनाची चाहूल लागताच होणारी तारांबळ आनंद, पती मोहिमेवर निघताच होणारा वियोग – दुःख अशा कितीतरी सुक्ष्म भावछटा शाहिरांनी काव्यात रचलेल्या आहेत. त्यामुळेच शृंगाररसाच्या अविष्कारात विविधता व जिवंतपणा आलेला आहे.

शृंगाराच्या दोन प्रकारापैकी संभोग शृंगार रंगविताना अनेक शाहिरांचा तोल सुटला आहे. त्यामुळे त्यांच्या काव्यासंबंधी गैरसमज निर्माण झाले. मीलनाची वर्णने करताना काही वेळा शाहिरांकडून वर्णनाचा अतिरेक होतो. उत्तान आणि भडक अशी वर्णने येतात. नको ते शब्द अनेकदा लावण्यातून येतात. स्त्रीने कामातूर होऊन स्वतःच्या कामभावनेचे रसभरित वर्णन करून पतीला उत्तेजीत करावा किंवा कामातूर पतीच्या विलासाचे व अतिरेकाचे भडक वर्णन करावे असे सदाभिरूचीची मर्यादा ओलांडणारे अनेक प्रसंग शाहिरांच्या लेखणीतून दिसतात. हा विलास फक्त पती–पत्नीचाच

असतो असे नाहीतर अनेकवेळा अनैतिक प्रकाराचाही उल्लेख येतो. त्यामुळे विलासाची ही नागडी–उघडी वर्णने बिभत्स वाटतात. त्यामुळे शाहिरांना आपला संयम राखता आला नाही असे नाईलाजे म्हणावेसे वाटते. पण हाही दोष त्यांचा नाही ते ज्या काळात वावरत होते त्या काळाचा दोष आहे. पण सुदैवाने अशा वर्णनातही काही ठिकाणी सुदंर काव्य आढळते. काही ठिकाणी कल्पनाविलासाने व भावेत्कठतेने हा अतिरेक भरून काढला गेला. विशेषता शृंगारसाला उठाव देणारी सुंदर वर्णने अनेक ठिकाणी विखुरलेली आहेत. रंगमहालाचे किंवा उद्यानाचे वर्णन करताना शाहिरांची प्रतिमा विशेष फुलते. प्रभाकरांच्या लावणीतील हे वर्णन पाहा,

बहार हा झाला रात्री मोतीया फुलला, द्राक्षीचे मंडप बाई छाया अतिदाट ग !

पाचव्या मजल्यावरती सफेतीचा थाट गं ! पडदे चिकाचे भंवते मधी चोरवाट ग ! कांचेंची कारंजी कंदील शोभती ! घोस फूलांचे वरूनि सुगंधीत लोंबती ! खुशालीत मजला स्वामी घेऊनी बैसती ! तेंव्हा असे वांटे अधि म्यां इश्वर पुजिला ! झुळझुळ वारा वाहतो चांदणे थंड ग ! लावूनि रूपेरी हलके हिंदोळे बांधले ! खांब सुरूचे नकासून साधले ! त–हत–हेचे रंग छतापती दीधंले ! इंद्रभुवन भासे पाहूनिया मजला !! (10)

शृंगाररसाला उठाव आणणारी अशी काव्य वर्णने अनेक कवणातून आढळतात कधी कधी प्रियतमने पिवळा साज केलेला असेलतर कधी कधी हिरवा साज केलेला असेल त्या शृंगाराचीही वर्णन मोठी काव्यमय आहेत. शृंगाररसाच्या या प्रकारात प्रेमळ रूसव्यांचीही वर्णने अनेक ठिकाणी केलेली आहेत. सजण रूसला आहे आणि साजणी त्याची समजूत करते आहे अशी चित्रे अनेक ठिकाणी सापडतात. त्यातील भावनांची कोमलता मोठी मोहक आहे. अशी चित्रे अनेक ठिकाणी रंगविलेली आहेत. तर काही ठिकाणी साजणी रूसली आहे व सजण तिची समजूत काढत आहे. हा प्रेमळ रूसवा शृंगाररसाला पोषकच आहे. अशी लोकजीवनातील विविधता लावणीत एकवटली आहे. या विविधतेमागे अभंग असे मरामोळे मन उभे आहे.

कृष्ण आणि गोपीवरही शाहिरांनी पेहेराव, भाषा आणि जीवनविषयक कल्पनांचा अस्सल मराठी साज चढविला आहे. लावण्यातील नावेही साळू, मैना, चिमणी, अशी आहेत. मराठी संस्कृतीचे हे सारे इर्शन अस्सल स्वरूपाचे आहे.

अनंतफंदीची चंद्रवळा लावणी बरीच लोकप्रिय होती. फंदीच्या काळातील स्त्री सौंदर्य विषयक दृष्टी काय होती, याची कल्पना या लावणीवरून येते. कृष्णाने राहीचे रूप घेतल्यावर जे अलंकार घातले त्याचे तपशीलवार वर्णन करून वेलबाळया, पानबाळया, भिकबाळया, मासबाळया  अशा बत्तीस बाळयांचे उल्लेख आहेत. त्यावरून तत्कालीन समृध्दी प्रकट होते. शृंगारवर्णनात मात्र कवीचा तोल सुटला आहे. कृष्णजीवनाधारे शाहीर श्रोत्यांच्या शृंगाराची भूक कशी भागवीत याचा एक उत्कृष्ठ नमूना म्हणजे ही लावणी होय. चंद्रावळ लावणीत कथा कृष्णाची पण बाहयता रूप मात्र माणसाचे आहे. फंदीची त्रिस्तनीची लावणीही बरीचशी किळसवाणीच आहे. अकुरावरील लावणीतून कृष्णांवरील गोपींच्या प्रेमाचे दर्शन घडविलेले दिसून येते. एका लावणीत तर त्यांनी संध्येतील भंगवतांची चोवीस नावे एकत्र गुंफंन दाखविलेली आहेत. 'तर धन्य तुझे लावण्य' या लावणीतील नायिकेच्या पायातील जोडव्याचे वर्णन करताना ते म्हणतात मांडया गुडघ्या सरळ पोट–या पायी जोडवी खणाणी !जसे घोडयाचे नाल वाजती आवाज कानी दणाणी. (270)

आजवर मनात भरणा–या रतिरूप सुदंरीची वर्णन अनेक शाहिरांनी केली पण नयन सुरेख दोन्ही लाल अंगावर शाल दुपेटा जरी! उमदा कोणी उमराव दिसे सरदार सौभाग्य घरी,! हे शाहीर परशरामाने केलेले मर्दानी सौंदर्याचे वर्णन लक्षात रहाण्यासारखे आहे. किंवा सांड गावामधी फिरतो भांड रिकाम टेकडा'' असे आपल्या ऐतखाऊ नादान नव–याचे चित्र रेखाटणारी स्त्री यात दिसते. तर कधी निर्मळ मुखडा चंद्रकार सरळ नाकाची शोभते धार, किंवा गगनात चांदणी ठळक मारिशी झळक उभी ग अंगणी ! किती नटून थटून मारशिल छनाछन नयनाच्या संगिणी ! निपुत्रिका, गरोदर लेकुरवाळया अशा स्त्रियांचेही मनोभाव परशरामाने काही लावण्यातून टिपलेले आहेत. (273) तर प्रखर विद्वतेची परंपरा असलेल्या घराण्यात न रमता व्युत्पन्नता आणि कवित्व याचा सुंदर समन्वय घडवून व्यक्तीमत्वाचा ठसा शाहिरी काव्यात उठविणारा व पंडीत कवी आणि शाहिर कवी या दोन परंपराचा दुवा जोडणारा कवी म्हणून ज्यांचा नावलौकिक आहे. त्यांनी लावण्यात स्त्रीच्या, यौवनाची, प्रियकरासाठी होणा–या तळमळीची वर्णने चित्रीत केलेली असली तरी ती सर्व प्रस्तापित नीतीच्या चौकटीत मर्यादित ठेवलेली आहेत. सुदंरा मनामध्ये भरली, ही रामजोशीची प्रसिध्द आणि रसिक प्रिय लावणी स्त्री सौदर्याच्या मोहक आणि उन्मादक वर्णनाा सुंदर नमुना आहे.

सुंदरा मनामध्ये भरली जरा नाही ठरली हवेतील शिरली मोत्याचा भांग, किंवा अंगि तारूण्याचा बहर ज्वानिया कहर मारिते कहर मदन तलवार अशा प्रायात्कतेने या लावणीच्या सौंदर्यात भर घातली आहेत.

संस्कृतातील संकेताचे अनुकरण करून मराठमोळया स्त्रीचे सौंदर्य व तिचा साजशृंगार रामजोशींनी मोठया ढंगदारपणं व्यक्त केला आहे. कुण्या ग सुमगाची तु मंजिरी ही लावणी अशीच आहे. शृंगाराला भरपूर अवसर असणा–या कृष्णलिलावर्णनपर लावण्यातही रामजोशीनी सद्भिरूचीची बंधने सोडलेली नाहीत. त्यात शृंगार आहे पण तो विप्रलंभ आहे. त्यांचे संभोग शृंगारात पर्यवसान होत नाही. राधा–कृष्ण यांच्या होरीच्या प्रसंगीच्या क्रीडेचे वर्णनही त्यांनी अत्यंत बहारीने केले आहे. राधेने कृष्णाचे व कृष्णाने राधेचे रूप घेतल्यामुळे जो संभ्रम निर्माण झाला त्यामुळे सा–या प्रसंगात काही औरच रंग भरलेला आहे. नर्म आणि सूचक शृंगारामुळे रामजोशीची लावणी कायम स्मरणात राहाते. लौकिक विषयावरील अनेक लावण्यात रामजोशीनी स्त्रीमनाचे विविध रंग चितारले आहेत.'झाली तरूणपणाची धुळ पति नाही सेजेवरी सुंदरा रडे मुळमुळ. ! अशी विरहव्याप्त नाचिका एका लावणीत आढळते. तर दुसरीत तुम्ही सजणा–सुजणा घ्या

आदराचे पान !मज दुबळीचा राखा स्वाभिमान.! अशी पतीची विनवणी करणारी पतिव्रता आढळते. तर दुस—या बाजीरावाच्या काळात लावण्यात शृंगाराच्या वेगवेगळया छटा दाखविणारे शाहिर प्रभाकर यांनी लावणीतील शृंगारवर्णनात नैतिकतेचे बंधन न राखल्याने हा शृंगार उद्याम झालेला दिसतो. कामवासनेच्या भडक चित्रांचे वर्णन त्यातून घडते. पण काही लावण्यातून त्यांची सुंदरतही दिसते. ''मोहिनी जसी सुरसभेमधी अमृत वाढीकरी ! तशी नार पंगतित आगृह करी.! खानदानी स्त्रीच्या सौंदर्याचे सुंदर वर्णन 'डुलत डुलत चाले झुलत झुलत बोलता हले हलकडी या लावणीत आढळते. कधी प्राण सखे भेटती. या विरहाने तळमळणारी आणि नका जाऊ दूर देशी घरी काय धन द्रव्याला कमी. आली हो वर्षाची नागपंचमी' असा पतीला घरी राहण्याचा आग्रह धरणारी पत्नी काही लावण्यात आढळते. सगुण गुण गंभीरा तुला कशी दुपारची रे सोसेल काहथली. अशी एकीला चिंता वाटते तर दुसरी कुचाची नौबल झाली म्हणून पतीला उठवून स्वारीवर पाठविते. पतीसोबत स्वारीवर येण्याचा हटट धरणा—या एखादया नायिकेची' परम परदेश कठीण काते. कसे ग तुज न्यावे सगुणशांते'. अशी समजूत घालण्याचा यत्न नायक करतो. निपुत्रका आणि गर्भवासिनीच्या भावना प्रभाकराच्या लावण्यातून व्यक्त झालेल्या आहेत. तत्कालीन मराठी स्त्रीच्या अंगावरील विविध दागिन्याचेही वर्णनही प्रभाकराच्या लावणीत आढळते. तर लढाईत नव—याला जाण्यास परावृत्त करणारीही लावण्यावती नायिक या ठिकाणी दिसते.

'मुळी मुलुख कर्नाटक, निर्दयी लोक कंटक !

विश्वासघातकी ठक, बिकट झाडीच चहूकडून अशी स्त्रीरूपे प्रभाकरांच्या लावण्यातून दिसतात. तर सगनभाऊंच्या लावण्यातून नायक नायिका संवाद साधण्याचा प्रयत्न करतात. सगन भाऊंच्या लावण्यात शृंगाराच्या बाहयवर्णनापेक्षा मनोभावनेला आधिक प्राधान्य आहे. 'असी कि रे प्रीत वाढल' या लावणीत 'आली दुनिया उफराटी फार तुम्ही साधवगिरीने असा', हा व्यावहारिक उपदेश करणारी नायिका दिसते. इतकेच नव्हेतर परनारीशी भाषण करता विचार नाही बरा' असा नीतीविषयक उपदेशही सगनने तिच्या तोंडून वदविला आहे. चंद्राचे चांदणे शीतल का उष्ण या लावणीत नायक नायिकेच्या सवाल जबाबातून घडणारे शृंगारदर्शन मार्मिक आहे. दौलताबादच्या साबाजी अनंताची प्रीती मिळावी म्हणून बेदरच्या कामसेनेने योजिलेल्या युक्त्यांचे वर्णनही एका लावणीत आले आहे. सक्तीसवतीचे भांडण या विषयावर सगनची असून त्यातील नवरा मिस्कील आहे ' घोर जीवाला लावून गेली परम जीवाची सखी म्हणून मुशाफर बनून तिच्या दारी जाणारा नायक किंवा मर्दानी पोशाख करून प्रियकराला भेटायला जाणारी नायिका अशी कल्पनारम्य वातावरणातील व्यक्तीचित्रे या लावण्यात आढळतात. पण इतर शाहिराच्या मानाने सगनभाऊची विद्वता कमी असलीतरी भाषेत मात्र जोम आहे. या उलट होनाजीच्या लावण्यातून प्रेम भावनेच्या विविध छटा हळुवारपणे व्यक्त झाल्या आहेत. शृंगाराच्या उत्तान भावनेपासून निपुत्रिकेच्या करूण आर्ततेपर्यतचे कितीतरी वेगवेगळे रंग त्यात आढळतात प्रीतीचे बाण मारून प्रवासाला निघून गेलेल्या पतीच्या विरहाने झुरणारी नवोढा, विरहावस्थेत परपुरूषाला चतुर्थीच्या चंद्राप्रमाणे वर्ज्य मानणारी एकनिष्ठ पत्नी'. गेला जसा तसा कधी पाहीन आपला प्राणविसावा, सत्वर उठा संख्यानो मजला पक्ष्यांचे पर लावा.' असे व्याकुळ उदगार काढणारी विरहांतरिता, अशी कितीतरी सुंदर चित्रे त्यांच्या विरहिणी गीतात सापडतात. 'तुझ्या प्रीतीचे दुःख मज दाऊ नको रे बघुन जाई प्राण घेई जगी ठेवू नको रे.' या लावणीत प्रीतीचे सामर्थ्य व प्रीतीचा परिणाम कवी घडवितो. जगी सांगतात प्रीत पतंगाची खरी. झडप घालून प्राण देतो दीपकाचे वरी'. अशी प्रेमविषयक जाणीवही करून देतो. रामजोशीच्या सुंदरा मनामध्ये भरली. या लावणीप्रमाणे होनाजीची लटपट लटपट तुझं चालणं ग मोठया नख—याचं, बोलणं गं मंजुळ मैनेचं ही लावणी म्हणजे मराठमोळया स्त्रीच्या सौदर्याचे सुंदर वर्णन आहे. या वर्णनाला डौलदार गथीची साथ आहे. नादमय शब्दयोजना शब्दांची पुनरूक्ती आणि समर्पक उत्पेक्षा यांतून मराठमोळया सौदर्याची नखरा ढंगदारपणे साकार झाला आहे. 'सरळ चिरी कुंकवाचि कपाळी लाल जशी पिकली मिरची किंवा बांधिव बुचडयाची लबक पदर अति सुरेख खोविला तिपदरी वेणीचा चंदन ढाळीत जसा लपेटा काळे नागिणीचा', अशा सुंदर पंक्ती सहजवणे गवसतात. हिण माझे प्रालब्ध वांझपण कधी फिटेलबाई. एक बालक पोटीनाही असे निपुत्रिका स्त्रीचे दुःखही या लावण्यात सापडते तर एका लावणीत निपुत्रकेला दिवस रहातात त्यावेळचा तिचा आनंद व्यक्त केला आहे. गतभर्तृकेचे दुःखही एक लावणी सांगून जाते. स्त्रीहदयाचे सुक्ष्म विश्लेषण हे होनाजीच्या लावण्याचे वैशिष्टय आहे.

काही लाचण्यात शृंगाराचा अतिरेक झाला असलातरी पतिव्रत्याचे आणि प्रेमाचे सामर्थ्य याचे पुरेपुर भान त्याला आहे. शरिरनिष्ठ आकर्षणाचे पर्यवसान नीतीप्रद संबंधात व्हावे, अशी होनाजीची अपेक्षा आहे.

एका लावणीत साजणी सजनाची समजूत करीत आहे ते पहा.

'तुम्ही सजना—सुजणाच्या आदराचे पान, मज दुबळीच्या राखा स्वाभिमान, तुम्ही का रूसला काय चुकले सेवेला, प्रतिपाल आजवर तुम्हिं माझा कां केला नाही कधी मला शब्द दुःखाचा दिला, एकाएकी निष्ठूर का हो झालां, म्या धीरधरला कंठी प्राण उरला, हया प्रीतीचे दुःख सांगू कोणाला, तुजसाठी सख्या करीन जीवाचे रान', यामधील भावनांची कोमलता केती रम्य आहे हे दिसते. चतुरसंवाद हाही शृंगाररसाच्या या प्रकाराला पोषक आला आहे. प्रियकर व प्रियतमा यांच्या उत्तर प्रत्युत्तरामध्ये अनेक ठिकाणी बुध्दिविलास आढळतो, पण त्याचे स्वरूप प्रेमभावनेला पोषकच आहे.

चंद्राचे चांदणे शितल का उष्ण प्राणपती

ते सांगा मजप्रती कल्पना डोळयांमध्ये खुपत'

असा प्रश्न करणारी सगनची नायिका मोठी चतुर असली पाहिजे.

'घडी घडी अरे मनमोहना हासून गुणीजना देखता नको रे बोलू मशी,'

हे संवाद मोठे मार्मीक आहेत. शाहीरी वाडमयातील संभोगशृंगाराचे स्वरूप असे विविध आहे. त्यात अतिरेक आहे. अभिरूचीच्या मर्यादा ओलांडल्या आहेत असे वाटले तरी त्या काळाचा परिणाम म्हणून आपण सहन केला. तर त्यातील उत्कठ भावना, उत्कृष्ठ कल्पनाविलास व वातावरणाचा उठाव करणारी शृंगारसाला पोषक अशी वर्णने आपल्या मनाला मोह पाडतील.

संभोग शृंगाराकडून विप्रलभ शृंगारकडे आपण वळलो तर मात्र शाहिरी प्रतिभेचा मोठा रम्य विलास दिसतो. वियोगाने व्याकूळ झालेल्या स्त्री–पुरूषांच्या भावनांचे वर्णन शाहिरांइतके इतर कोणी केले नसेल, व्याकूळ झालेल्या स्त्री–पुरूषांची चित्रे, यातना ते उत्कठतेने मांडतात. त्यामुळे विप्रलंभ शृंगाराचा उत्कटं अविष्कार झालेला दिसतो. विरहावस्थेने पोळलेल्या या नायिकांच्या चित्रणात सुध्दा विविधता आहे. पती हौस न पुरवता प्रवासाला गेला म्हणून तक्रार न करणा–या नवविवाहित तरूणीपासून ते पती वियोगाने अन्नपाण्याचा त्याग करून झुरून शरीराचे पांजर करणा–या नायिकांचे चित्रणही दिसते. त्यासाठी पतीला निरोप कळवा असेही सांगते तर मोहिमेवर निघणा–या पतीवियोगाने विकल झालेली नायिका दिसते. अशा अनेक छटा शाहिरांनी आपल्या कवनात रंगविल्या आहेत. प्रत्येक भावनेच्या अविष्कारांत नाविण्य आणण्याचा प्रयत्न शाहिरांनी केलेला आहे.

'नूतन वय दोघांचे सारखा जोडा गे बाई

पित प्रवासा जाती हौस मनाची पुरली नाही असे म्हणून तक्रार करणारी नायिका आहे. ऋती आपल्या सखीला सांगते.

''कोण उपाय करावा मी घरची सासुरवासी ! दर्द जिवांतील माझा मी तरी सांगू कोणापाशी ! दोन गोष्टी समजावून सख्ये सांग भ्रताराशी ! येथेच इश्वर देईल म्हणावे द्रव्याच्या राशी ! नित्य उठूनी अंतरी प्रार्थना करिते देवासी ! पती घरी राहतील असा कधी पावल नवसासी ! तर दुस–या नायिकेची अवस्था अधिक करूणाजनक आहे. तिचाही पती प्रवासाल गेला आहे. ती म्हणते.

पती प्रवासामध्ये सखे मी येकली मंदीरी !

कंदु कोणाच्या वळे पाठवा पत्र हिलून या तरी !! नंतरही ती आपली आवस्था वर्णन करते. झुरझुरून पांजर झाले शरीर निपटराहिली हाडे ! राजे दिवस घोकणी पतीच्या लक्ष वाटेकडे !! अन्नपाणी वर्जिले सखे मज नित्य उपोषण धडे !! पण याशिवाय सुखोपभोगाचा अतिरेकही कसा दुःसह झालेला आहे याचेही वर्णन करताना ती म्हणते.

जागोजागी कारंजी बैठका त्या उदास दिसती ! न.ये नरम मखमाली बिछाण्यावर निद्रा मजप्रती ! गळा फुलाची हार सर्पासारखी  भासती !! एका नायिकेला पतिवियोग हे थोर दुःख वाटते – पण पतीवरील तिची निष्ठा कायम दिसते.

निज घर सोडूनि सखे पारखे घरी ! जावे वाटे पद ठेवणे अहिफ णावरी ! अन्य पुरूष चंद्रवरद चतुर्थीपरी ! न पाहताजन तद्वत मनवृत्त हे सुंदरी ! यावरून नैतिक मर्यादेची व एकनिष्ठेची जाणीच दिसते.

त्याही पेक्षा परिणामकारक वर्णन आणखी एका कवनामध्ये आले आहे. विरहाते तडफडणारी ती नायिका म्हणते :–

'हार नव्हता मंधि सहात सदन कसे सकंट वडवडले !
रंसार भट पडो दोघांमधि आड पर्वत पडले !!'

आणि नंतर तिला आपल्या पतीच्या सहवासात घालविलेल्या आधल्या रात्रीची स्मृती होते व जास्तच विरह व्याकुळ होते. त्याच्या प्रवासात काही संकटे आली असतील का म्हणून ती व्याकूळ व चिंताग्रस्त होते. पण एकंदरीत अशा धीरोदात्त नायिका कमीच बहूतेक विरहाने तळतळणा–या व पती जवळ नाही म्हणून झुरणा–या नायिका जास्त आढळतात त्यातील काही तर

'भ्रतार नव्हे हा दुश्मन पुरा
देऊन मला विश्वास प्रवासी गेला निघुन चांडाल खरा ।।'

असे म्हणण्यातही ती कमी करीत नाही,'तुझ्या प्रीतीचे दुःख मला दावुंन नकोरे अशी प्रेमळ तक्रार त्यानी केली तर नवल नाही विप्रळभ शृंगाराचे लावण्यातून व्यक्त होणारे हे स्वरूप पाहिल्यानंतर शाहिरांच्या अवलेकनाचीच व

परमनप्रवेशाच्या सामर्थ्याची साक्ष आपणाला पटते. सर्च शाहिरांच्या कवनातून नायिकाच विरह विकल झालेन्या आहेत कारण मोहिमेवर पुरूषाचे जाण्याचा तो काळ होता. त्यामुळे विरह कंठण्याची वेळ नायिकेवरच येते.परंतू विरही नायिकांची ही वृत्ती शुध्द व सात्यिक आहे त्या निष्ठायुक्त आहेत. अनितीच्या मार्गाने जाणाऱ्या खुप थोडया आहेत.

घरी भ्रतार आहे बिजवर ।कोण सवत एक पकडली ।
तो लंपट तिजवर । मी म्हणून खूप तूजवर ।

अशा रीतीने जशास तसे म्हणून वाममार्गाने जाणारी किंवा संक्रातीला तिळ गूळ देण्याच्या निमित्तीने परपुरूषाला घरात बोलविणाऱ्या काही नायिका शाहिरांच्या कवणात सापडतील म्हणून या प्रकारच्या सर्व लावण्यांतून दिसून येणारा भावनाविलास मनाची पकड घेतल्या शिवाय राहत नाही.

लावण्यात स्त्रियांचे संपूर्ण चित्र श्रोत्यांच्या किंवा वाचकांच्या नजरेसमोर उभे करणे शाहिरांचा खास हातखंडा होता.अनंतफंदी,प्रभाकर,परशरम,रामजोशी वगैरे व इतर शाहिरांच्या काव्यात स्त्री सौदर्य वर्णनाची कलात्मकता आहे. जनानी सौदर्य हा तर लावणीचा मुख्य विषय,त्यामूळे प्रत्येक शाहिर असे वर्णन करताना दुसऱ्यांवर मात करण्याचा प्रयत्न करतो आहे असे वाटू लागते. जनानी सौंदर्य वर्णन करण्याच्या भरात मर्दानी सौंदर्याकडे दुर्लक्ष झाले आहे असे नाही. त्यावेळच्या मराठा सरदाराचे मोठे रूबाबदार वर्णन अनेकांच्या कवणांतून आलेले. आढळेल. शाहिरांनी वर्णन केलेल्या या सर्व स्त्रियां किंवा पुरूष मराठा आहेत.दक्षिणेकडील नोकझोक व रूबाब त्यांच्या वर्णनातून ओसंडतो आहे. पंडीत कवींच्या काळात स्त्री सौदर्याची किंवा पुरूष सौदर्याची वर्णने  नाहीत असे नाही. पण ती पारंपारिक स्वरूपाची आहेत. ठराविक उपमा उत्प्रेक्षकां साहयाने केलेली वर्णने कोणत्याही देशातील सुंदर स्त्री पुरूषाला लागू व्हावीत, शाहीरांच्या काव्यांत तसे नाही. त्यांची चंद्रावळा सुध्दा पूर्णपणे मराठमोळा झाली आहे. महाराष्ट्रीय वेशभूषा, समजूती, मनोवृत्ती व सौदर्य शाहीरांच्या स्त्री पुरूषांच्या वर्णनातून ठसठशीतपणे दिसतात. म्हणून पंडीत कवींच्या काव्यांतील स्त्री पुरूषापेक्षा शाहिरांचे स्त्री पुरूष आपले वाटतात.

व्यक्ती वर्णनातील त्यांचे कौशल्य प्रसंग रेखाटणामध्येही आढळते. शाहिरांच्या बहुतेक लावणीत ही नाटयगीते आहेत. स्त्री पुरूषांच्या तोंडचे उदगार कवणांतून दिसतात. भाषा रसाप्रमाणे बदलते. विहहीणीचे दुःखात ती कोमल बनेल , रंगेल शृंगाराचे वर्णन करताना ती उत्तान बनेल. उपरोध पसंगी ती धारदार बनेल . वीरपसंगी ती ओजस्वी असेल. शाहिरांच्या भाषेतील हा लवचिकपणा विशेष उल्लेखनीय आहे त्याच बरोबर कल्पना परिणाम कारकपणे रंगविण्यासाठी शब्दांची मांडणी योग्य रीतीने करण्यात शाहिरांना यश आलेले आहे.अर्थानुसारी नादमय शब्दयोजना निवडण्यात त्यांचे कौशल्य दिसते.

कांहीही  असलेतरी लैकिक  जीवनात पूर्णतया समरसून काव्यलेख करण्याचे श्रेय शाहिरांना आहे. लौकिक भावभावनांचे रेंग घेऊन येणारा आत्माविष्कार , अस्सल म—हाटमोळेपणा , निवदेनाचा ढंगदारपणा त्यांनी मराठी कवितेला दिला. भाषेलाही काही नखरा आणि ढंग असू शकतो याची जाणीव त्यांनी करून दिला.

***संदर्भ : –***

1) पैंजण : – म. ना. अदवंत ( सं ) प्रकाशक साहित्य प्रसार केंद्र सीताबर्डी नागपूर
2) प्राचीन मराठी वाडमयाचा इतिहास – संपादक ल. र. नासिराबादकर फडके प्रकाशन.



***किसन संदिपान पवार.***
मराठी विभाग , विज्ञान  महाविद्यालय , सांगोला.  ता. सांगोला ,जि. सोलापूर.